महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
गो.ते. रुग्णालय संकुल इमारत,
१० मजला, मुंबई - ४००००१.
क्रमांक : कोरोना-२०२१/प्र.क्र.३६६/आ-५,
दिनांक : १६, ऑगस्ट, २०२१.

---

संदर्भ :-

१) साथरोग अधिनियम, १८९७.
२) आपत्ती निवारण कायदा, २००५.
३) भारतीय दंडसंहिता, १८६०.
४) महसूल व वन, आपत्ती निवारण मदत व पुनर्वसन विभाग आदेश क्र. डीएमयू-२०२०/ प्र.क्र.९२/आपत्ती-१, दि. ४ जून, १७ जून व २५ जून, २०२१.
५) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन समक्रमांक दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ चे आदेश.

**आदेश**

**ब्रेक द चेन - सुधारित मार्गदर्शक सूचना**

ज्याअर्थी, आपत्ती निवारण कायदा, २००५ नुसार सक्षम प्राधिकारी म्हणून अध्यक्ष, राज्य व्यवस्थापन समिती यांनी उपरोक्त आदेश पारित केलेले आहेत.

त्याअर्थी आता या आदेशाद्वारे उपरोक्त संदर्भ क्र.५ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आदेशातील मुद्दा क्र.४ हा ४ अ म्हणून दर्शविण्यात येत आहे आणि ४ ब नुसार निम्नलिखित सुधारणा अंतर्भूत करण्यात येत आहे.

**४) <u>शॉपिंग मॉल्स</u> :-**

अ. राज्यातील सर्व शॉपिंग मॉल्स सर्व दिवस रात्री १०.०० वा. पर्यंत सुरु ठेवण्याची मुभा देण्यात येत आहे. तथापि, शॉपिंग मॉलमध्ये काम करणाऱ्या सर्व व्यवस्थापन व कर्मचारी आणि प्रवेश करणाऱ्या सर्व नागरिकांचेही कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाच्या दोन मात्रा पूर्ण व दुसरी मात्रा घेऊन १४ दिवस पूर्ण झालेले असणे आवश्यक राहिल व तसे लसीकरण प्रमाणपत्र व त्यासमवेत फोटोसहीत ओळखपत्र प्रवेशद्वारावर दाखविणे आवश्यक राहील.

**ब. वय वर्षे १८ खालील वयोगटातील मुलांचे लसीकरण अद्याप सुरु न झाल्याने वय वर्षे १८ खालील वयोगटातील मुला/मुलींना मॉल मध्ये प्रवेश करताना वयाचा पुरावा म्हणून आधारकार्ड, आयकर विभागाने निर्गमित केलेले पॅनकार्ड किंवा वयाचा उल्लेख असलेले शाळा किंवा महाविद्यालयाचे वैध ओळखपत्र प्रवेशद्वारावर दाखविणे आवश्यक राहील.**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

16/8/21
( सीताराम कुंटे )
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत :-**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.